# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे अंतर्गत प्रस्तावित हिंजवडी ते शिवाजीनगर या २३.३ कि.मी. लांबीच्या मेट्रो मार्गिका क्रमांक ३ साठी PCMC हद्दीतील मौजे वाकड, तालुका मुळशी येथील काही खाजगी जमिनी वाटाघाटी द्वारे थेट खरेदीने हस्तांतरण करुन घेणेबाबत जाहीर नोटीस www.pmrda.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी सदर तपशील तपासून संमती पत्रे (विकल्प) दिनांक ०८.०७.२०२० पर्यंत सादर करावे.

स्थळ : पुणे

दिनांक : ०३.०७.२०२०

(विवेक खरवडकर)
मुख्य अभियंता,
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

# Pune Metropolitan Region Development Authority, Pune

Pune Metropolitan Region Development Authority, Pune is implemanting Hinjewadi to Shivajinagar Metro Project (23.30 km). For this project, some private lands parcels are required in PCMC limits at Wakad, Taluka Mulshi. PMRDA intends to purchase the lands by private negotiation. Land requirement and other details are available on PMRDA website www.pmrda.gov.in Interested land owners should check the details and submit their consent letters up to 08/07/2020.

Venue: - Pune
Date: - 03/07/2020

**(Vivek Kharwadkar)**
Chief Engineer,
Pune Metropolitan Region Development Authority, Pune

PUNEMETROPOLIS

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत प्रस्तावित हिंजवडी ते शिवाजीनगर २३.३ कि.मी लांबीचा मेट्रो मार्गिका क्रमांक ३ साठी खाजगी क्षेत्रातील जमिनी खाजगी वाटाघाटी द्वारे थेट खरेदीने ताब्यात घेणेबाबत**

**जाहीर नोटीस**

१. ज्याअर्थी कार्यकारी अभियंता, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांना पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील प्रस्तावित २३.३ कि.मी. लांबीचा मेट्रो मार्गिका क्रमांक ३ साठी मौजे वाकड, तालुका मुळशी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील वर्णन केलेल्या जमिनींची आवश्यकता आहे किंवा त्यांची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. त्यानुसार सदर जागेचे भूसंपादनाचे प्रस्ताव पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्याकडे मेट्रो मार्गीकेसाठी आवश्यक खाजगी जागांचे भूसंपादांचे प्रस्ताव सादर करण्यात आले होते ते खालील प्रमाणे :-

**पिंपरी चिंचवड महानगर पालिका हद्दीतील जमिनी**

| अ.क्र. | मौजे | तालुका | गट/सर्व्हे क्रमांक | हिस्सा क्रमांक | वाटाघाटीने खरेदी करावयाचे क्षेत्र (चौ.मी) |
|---|---|---|---|---|---|
| १ | वाकड | मुळशी | १६० | | ७७१.२० |
| २ | वाकड | मुळशी | १५९ | ८ पैकी | ११.७ |
| ३ | वाकड | मुळशी | ७ | | ४१३.२ |
| ४ | वाकड | मुळशी | १६० | | १७४.३ |
| ५ | वाकड | मुळशी | १६३ | | ३१३.८ |
| ६ | वाकड | मुळशी | ७ | | २६३.३ |
| ७ | वाकड | मुळशी | ६ | | ८५४.१ |
| ८ | वाकड | मुळशी | ८ | | ४१४.५ |
| | | एकूण क्षेत्र | | | ३२१६.१० |

आणि ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे खाजगी जमीन वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने घेण्याबाबतची विनंती केली आहे. त्याअर्थी संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलीत धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीने कार्यकारी अभियंता, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचे नावे खरेदी देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व दर ठरवण्यास सक्षम अशा समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरीत्या स्वीकारण्यास तयार असल्याबाबतची संमती पत्रे (विकल्प) या नोटीशीन्वये मागवीत आहेत.

२. संबंधित भूधारकांनी हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) मुख्य अभियंता मेट्रो प्रकल्प, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचे कार्यालय सहावा मजला, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, आकुर्डी - ४११०४४ येथे दाखल करावीत.

३. संमतीपत्र (विकल्पाचा) नमुना कार्यकारी अभियंता, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचे कार्यालय तिसरा मजला, चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, आकुर्डी - ४११०४४ व संबंधित गाव कामगार तलाठी यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

स्थळ : पुणे

दिनांक : ०३/०७/२०२०

विवेक खरवडकर

मुख्य अभियंता, मेट्रो प्रकल्प

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे